# प्रमाणपत्र

विष्णुदास भगवानदास धुमाळ यांनी 'संत नामदेवांच्या अभंगातून व्यक्त झालेले 'आत्मचरित्र' या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीतीने लघु - प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनांतील विश्लेषण आणि विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने अन्यत्र उपयोजिला नाही.

प्रस्तुत विषय ''काव्य'' या वाङ्.मय प्रकारातील आहे.

हा लघु - प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

सोलापूर

दि.१७जून २००२

मार्गदर्शक
(डॉ. राजेंद्र बीडकर )
मराठी विभाग प्रमुख (सेवानिवृत्त)
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर

SANGAMESHWAR COLLEGE SOLAPUR.

प्र. प्राचार्य
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर
**Principal-in-Charge**
**Sangameshwar College**
**Solapur**

DR. R. G. HIREMATH
Head Department of Marathi
Sangameshwar College, Solapur

# प्रतिज्ञा पत्र

मी विष्णुदास भगवानदास धुमाळ प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, 'संत नामदेवांच्या अभंगातून व्यक्त झालेले 'आत्मचरित्र' या विषयावरील लघु - प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम. फिल. (मराठी) या पदवी परीक्षेसाठी सादर करीत आहे.


हा लघु - प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी मी तो सादर केलेला नाही.

अभ्यासक

**विष्णुदास भगवानदास धुमाळ.**

सोलापूर

दि.१७जून २००२


श्री विठ्ठल प्रसन्न

# भूमिका

प्राचीन मराठी साहित्याची मला प्रथमपासूनच आवड आहे. मी श्री क्षेत्र पंढरपूरचा असल्याने आणि आमच्या घराण्यात वारकरी संप्रदायाची परंपरा असल्याने माझ्या आई - वडिलाकडून बालपणीच भक्ती मार्गाचे संस्कार झाले. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मराठीतील इतर वाङ्मय प्रकाराचे वाचन करीत होतो. तरीपण माझे मन संतांच्या भक्ती काव्यातच अधिक गुंतत होते. म्हणून मी संतचरित्रे वाचली. त्यांची भक्तीरचना अभ्यासली.

एम्. फिल. चा अभ्यास करताना लघुप्रबंधासाठी कोणता विषय घ्यायचा याचा विचार चालला तेव्हा माझ्या मनाला संत साहित्यावरच काहीतरी संशोधन करावे, समीक्षा करावी असे वाटू लागले. सुदैवाने माझे मार्गदर्शक डॉ. राजेंद्र बीडकर यांनी अनेक वर्षे प्राचीन मराठी साहित्याचा इतिहास या विषयाचे अध्यापन केलेले असल्याने त्यांनाही काव्याबद्दल आत्मीयता आहेच. या संदर्भात संगमेश्वर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजशेखर हिरेमठ यांच्याशी चर्चा करीत असताना 'आत्मचरित्र' एक वाङ्मय प्रकार या दृष्टीने संत नामदेवांच्या अभंग काव्याचा अभ्यास करता येईल का पहा? असा विचार मांडला, तेव्हा असे वाटले की, संत नामदेवांचे बहुतेक अभंग म्हणजे त्यांचे जीवनचरित्र - आत्मचरित्राच होय. म्हणून मी 'संत नामदेवांच्या अभंगातून व्यक्त झालेले आत्मचरित्र' हा विषय निवडला आहे.

'नाचू कीर्तनाचे रंगी . ज्ञानदीप लावू जगी॥' संत नामदेव, अशी सकल जिवांच्या उद्धारार्थ प्रतिज्ञा करणाऱ्या या महान संतांच्या अभंगाचा अभ्यास करण्याची संधी मला मिळते आहे. हे मी माझे परमभाग्यच समजतो. कारण 'संताचिये पायी हा माझा विश्वास। सर्व भावे दास झालो त्यांचा ॥' या संत तुकारामांच्या वचनाला अनुसरून या संदर्भात माझे मार्गदर्शक डॉ. राजेंद्र बीडकर यांच्याशी चर्चा केली असता व मराठी विभाग प्रमुख डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी माझी इच्छा पाहून हा विषय निवडण्यास मला प्रोत्साहन व संमती दिली. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

प्रस्तुत लघु - प्रबंधासाठी मराठीतील नामवंत समीक्षकांचा आणि संत वाङ्मयकारांच्या ग्रंथाचा उपयोग मला झाला. सर्वश्री - डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. ग. वि. तुळपुळे, ह. भ. प. ल. रा. पांगारकर, डॉ. वि. भ. कोलते, प्रा. अ. म. जोशी, डॉ. मु. श्री. कानडे, डॉ. आनंद यादव, श्री. वसंत

बोरगांवकर, श्री. ह. श्री. शेणोलीकर, डॉ. प्र. न. जोशी, विनाबा भावे, डॉ. अशोक कामत या सर्वाचे ऋण मान्य करणे मला योग्य वाटते.

हे प्रबंध लेखन करीत असताना अनेकांचे सहकार्य लाभले. सर्वश्री मा. नामदार डॉ. पतंगरावजी कदम साहेब, (संस्थापक कुलपती भारती विद्यापीठ, पुणे.) आदरणीय डॉ. शिवाजीराव कदम सर (कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे.) प्राचार्य आर. बी. पाटील, आणि प्राचार्य एम.ए. खैरे,(भारती विद्यापीठ पुणे.), ह.भ.प. तुळशीदास नामदास महाराज, पंढरपुर, श्री. म.भि. नाईक , श्री. ग.ह. घोगले या सर्वांनी मला प्रेरणा दिली आणि मार्गदर्शन केले. या सर्वांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

संगमेश्वर कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. आर. एस्. ढेपे यांचे ही सहकार्य लाभले. भारती विद्यापीठातील ग्रंथालयाचा मला खूपच उपयोग झाला. माझे मार्गदर्शक डॉ. राजेंद्र बीडकर यांनी वेळोवेळी लेखन कार्यास मदत करून सहकार्य केले. तसेच संगमेश्वर कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजशेखर हिरेमठ यांचे ही बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वाचा मी ऋणी आहे.

हा लघु - प्रबंध लेखन करताना माझे कुटूंबातील माता - पिता यांचा आशीर्वाद लाभला. तसेच पत्नी सौ. शिलादेवी यांची मोलाची मदत झाली. या सर्वांच्या सहकार्यामुळेच मी लेखन करू शकलो. म्हणूनच त्यांचा कृतज्ञतापुर्वक उल्लेख करावा वाटतो.

या लघु - प्रबंधाचे संगणकीय मुद्रण अल्पवेळेत एस. के. कॉम्प्युटरचे श्रीयुत शहाणे बंधुव्दय यांनी करुन दिल्याबद्दल त्यांचे आभार.

**विष्णुदास भगवानदास धुमाळ**